पुणे परिसर पुणे, गुरुवार, १४ डिसेंबर २०२३

## → शहर परिसर




ग्रँट शेरेटन, राजा बहादूर मिल रस्ता : 'निश्चय २०२३' परिषदेत बोलताना विश्वकर्मा समूहाचे कार्यकारी विश्वस्त आणि विश्वकर्मा विद्यापीठाचे अध्यक्ष भरत अगरवाल.

# विश्वकर्मा शिक्षण समूहातर्फे औद्योगिक, शैक्षणिक समन्वय परिषद

**पुणे :** विश्वकर्मा शिक्षण समूहाच्या व्हीआयटी, व्हीआयआयटी, विश्वकर्मा विद्यापीठ यांच्यातर्फे आयोजित औद्योगिक व शैक्षणिक समन्वय परिषद 'निश्चय २०२३' बुधवारी उत्साहात झाली. परिषदेसाठी उद्योग क्षेत्रातील २४० हून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. 'कृत्रिम बुद्धिमत्तेचा तंत्रज्ञान, उद्योग, शैक्षणिक आणि उद्योगासाठी कुशल मनुष्यबळ नेमणुकीसाठी वापर' या विषयांवर परिषदेमध्ये चर्चासत्र झाले. अक्सेंचर कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक शैलेश कुलकर्णी आणि टीईया कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालिका रूपा भरवानी यांनी उपस्थितांना विशेष मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात विश्वकर्मा शिक्षण समूहाचे कार्यकारी विश्वस्त भरत अगरवाल यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा शैक्षणिक कारभारात वापर ही काळाची गरज असल्याचे नमूद केले व अंगीकृत करण्याचे आवाहन केले. संस्थेतील अधिष्ठाता (उद्योग संबंध) प्रा. कार्तिक यांनी परिषदेच्या आयोजनाचा उद्देश प्रास्ताविकात सांगितला. या प्रसंगी विश्वकर्मा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सिद्धार्थ जबडे, 'व्हीआयटी'चे संचालक डॉ. राजेश जालनेकर, 'व्हीआयआयटी'चे संचालक डॉ. विवेक देशपांडे, संचालक (उद्योग संबंध) डॉ. अतुल कुलकर्णी, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख व पदाधिकारी उपस्थित होते. प्रा. दीपाली जोशी, प्रा. अर्चना रत्नपारखी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अमोल रणदिवे यांनी आभार मानले.